नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - १४६ Issue - 146 | वार शनिवार दि. १२ ऑक्टोबर २०२४ Blow- Saturday Date 12 October 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## तमिळनाडूमध्ये रेल्वेचा अपघात! म्हैसूर-दरभंगा एक्सप्रेसची मालगाडीला धडक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

चेन्नई: तामिळनाडूच्या तिरुवल्लूर जिल्ह्यात रेल्वे अपघात झाला आहे. प्रवासी रेल्वे आणि एक माल गाडी यांच्यात घडत झाल्याचे रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले. म्हैसूर दरभंगा एक्स्प्रेस ही गाडी एका मालगाडीला धडकली. या अपघातानंतर बागमती एक्स्प्रेसचे आठ कोच रुळावरून घसरले. दोन रेल्वेची धडक झाल्यानंतर घटनास्थळी आग लागली.



या अपघातात आतापर्यंत कोणाच्या मृत्यूचे वृत्त नाही. मात्र काही जण जखमी झाले असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. तिरुवल्लूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, म्हैसूरहून दरभंगा मार्गे पेरम्बूरला जाणारी एक प्रवासी गाडी तिरुवल्लूरच्या जवळ कवारप्पेट्टीई रेल्वे स्थानकावर उभ्या असलेल्या एका माल गाडीली धडकली. घटनास्थळी रेल्वेचे अधिकारी पोहोचले आहेत.

रेल्वे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एक्स्प्रेस गाडी तामिळनाडूच्या कावरपेट्टई येथे उभी असलेल्या गाडीला धडकली. या अपघातात अनेक जण जखमी झाले आहेत. घटनास्थळी मोठी आग लागली. अपघाताबद्दल मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, म्हैसूर-दरभंगा एक्स्प्रेस (१२५७८) ही गाडी एका मालगाडीला धडकली. अपघातात किती जण जखमी झाले आणि

### सुदैवाने जीवितहानी नाही; घटनास्थळी भीषण आग

नेमकी परिस्थिती काय आहे याबाबत अद्याप रेल्वेकडून कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. तिरुवल्लूरचे जिल्हाधिकारी टी प्रभुशंकर यांनी सांगितले की, घटनास्थळी मदत कार्य वेगाने सुरू आहे.

२०२४ मध्ये ८ रेल्वे अपघात झाले आहेत. यातील अखेरचा अपघात पश्चिम बंगालमधील रंगापानी रेल्वे स्थानकाजवळ ३१ जुलै रोजी झाला होता. दोन मालगाडी रुळावरून घसरल्या होत्या, मात्र कोणीही जखमी झाले नव्हते. त्याआधी ३० जुलैला झारंखडमध्ये मुंबई-हावडा मेल रुळावरून घसरली होती ज्यात दोघांचा मृत्यू तर २० जण जखमी झाले होते. जुलै महिन्यात १८ तारखेला उत्तर प्रदेशमधील गोंडा-मनकापूर येथे चंदीगड-डिब्रूगड रेल्वेचे चार डबे रुळावरून घसरले होते. ज्यात ४ जणांचा मृत्यू झाला होता.

१७ जून रोजी एका मालगाडीने कांचनजंगा एक्स्प्रेसला धडक दिली होती ज्यात १५ जणांचा मृत्यू झाला होता. तर ६० जण जखमी झाले होते. २ जूनला पंजाबमधील सिरहिंदजवळ लुधियाना-अंबाला येथे दोन मालगाड्यांची धडक झाली होती. ज्यात दोन लोको पायलट जखमी झाले.

## तांत्रिक बिघाडामुळे विमानाच्या हवेतच दोन तास घिरट्या

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

चेन्नई : एअर इंडियाच्या विमानाचं त्रिची विमानतळावर आपात्कालीन लँडिंग करण्यात आलं आहे. हे विमान त्रिचीवरून शारजाहकडे जात होतं. शुक्रवारी सायंकाळी एअर इंडियाच्या विमानाने त्रिची विमानतळावरून उड्डाण घेतलं होतं. मात्र, उड्डाण घेताच विमानात तांत्रिक बिघाड झाल्याचं पायलटच्या निर्देशनास आलं. त्यामुळे हे विमान जवळपास दोन तास आकाशात घिरट्या घालत होते. अखेर काही वेळाने या विमानाला सुखरूप उतरवण्यात यश आले.

इंडिया टुडेने दिलेल्या वृत्तानुसार, शुक्रवारी सायंकाळी ५.३० वाजताच्या सुमारास ही घटना घडली. महत्त्वाचे म्हणजे या विमानात जवळपास १४० प्रवासी प्रवास करत होते. त्रिची विमानतळाच्या संचालकांनी दिलेल्या माहितीनुसार, विमानामधील हायड्रॉलिक सिस्टिममध्ये बिघाड झाल्याचं पायलटच्या लक्षात आलं. त्यामुळे या विमानाचे लँडिंग करण्यात आलं. महत्त्वाचे म्हणजे या घटनेमुळे त्रिची विमानतळावर आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली होती. संभाव्य धोका लक्षात घेऊन विमानतळावर अग्निशमन दलाच्या गाड्याही बोलवण्यात आल्या होत्या.



दरम्यान, या घटनेनंतर एअर इंडियाच्यावतीनेही यासंदर्भात प्रतिक्रिया देण्यात आली. त्रिचीवरून शारजाहकडे जाणारे एअर इंडियाच्या विमानातील हायड्रॉलिक सिस्टिममध्ये तांत्रिक बिघाड झाल्याने या विमानचे लँडिंग करण्यात आलं. यावेळी विमानामध्ये इंधनाचा साठा मोठ्या प्रमाणात असल्याने वजन कमी करण्याच्या हेतूने ते थोडा वेळ आकाशात फिरत होते. मात्र, काही मिनिटांतच या विमानाचे सुरक्षित लँडिंग करण्यात आलं. आम्ही या घटनेचा तपास करतो आहे, असं एअर इंडियाच्यावतीने सांगण्यात आलं.

### १४० प्रवासी करत होते प्रवास; अखेर झालं सुरक्षित लँडिंग

## थोडक्यात

### 'एसएमएस' पाठवण्यासाठी २४ कोटींचा खर्च; राज्य सरकारचा निर्णय वादात


पुणे : राज्य सरकारने घेतलेले लोकहिताचे निर्णय लघुसंदेशाद्वारे (एसएमएस) नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आता सुमारे चोवीस कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत. मात्र राज्य सरकारने या खर्चाला मंजुरी देण्याचा निर्णय म्हणजे 'लाडके ठेकेदार' योजना असल्याची टीका करण्यात येत आहे. लघुसंदेशाद्वारे निर्णय नागरिकांपर्यंत पोहोचवण्याच्या खर्चास मान्यता देण्याचा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाने प्रसिद्ध केला. त्यानुसार राज्य सरकारने साप्ताहिक बैठकीत घेतलेल्या निर्णयांना अधिकाधिक प्रसिद्धी मिळावी, लोकहिताचे निर्णय नागरिकांपर्यंत लघुसंदेशाद्वारे पोहोचवण्यासाठी माहिती आणि जनसंपर्क संचालनालयाने २३ कोटी ७८ लाख ८८ हजार रुपयांच्या खर्चाचा प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली आहे. तसेच डीएव्हीपी या संस्थेच्या यादीवर असलेल्या मान्यताप्राप्त संस्थांमधून ई निविदा प्रक्रिया राबवून संस्था निश्चितीची कार्यवाही करावी. अंमलबजावणीसाठी शासनाच्या निर्देशांचे, वित्तीय नियम, नियमावली, कॅगचे निर्देश, आर्थिक अंदाजपत्रक नियमावलीचे पालन करण्याबाबत स्पष्ट करण्यात आले आहे.

## सीमेवर १५० दहशतवादी घुसखोरीच्या प्रतीक्षेत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

श्रीनगर : जम्मू आणि काश्मीरमधील नियंत्रणरेषेपलिकडील तळावर जवळपास १५० दहशतवादी काश्मीर खोऱ्यात घुसखोरी करण्यासाठी प्रतीक्षा करत आहेत अशी माहिती सीमा सुरक्षा दलाच्या (बीएसएफ) वरिष्ठ अधिकाऱ्यानी शुक्रवारी दिली. हिवाळा जवळ येत असल्यामुळे ते घुसखोरीची तयारी करत आहेत. मात्र, सुरक्षा दले त्यांचा अशा प्रकारचा प्रत्येक प्रयत्न उधळून लावतील, असे या अधिकाऱ्याने सांगितले.

बीएसएफचे महानिरीक्षक (काश्मीर



आघाडी) अशोक यादव यांनी शुक्रवारी पत्रकारांना सुरक्षा दलांच्या सज्जतेबद्दल माहिती दिली. ते म्हणाले की, घुसखोरीचे प्रयत्न सुरूच राहतात. विविध गुप्तचर विभागांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे आम्ही सीमेवर वर्चस्व राखण्याची योजना आखण्यासाठी सैन्याशी समन्वय साधतो. त्यासाठी आम्ही त्यांच्या तळावरील दहशतवाद्यांची संख्या लक्षात ठेवतो. त्यामुळे आम्हाला रणनीतीला आखताना मदत होते. हा आकडा सामान्यत: १३० ते १५०पर्यंत असतो, कधीकधी यापेक्षा जास्तही असतो, अशी माहिती यादव यांनी दिली. नुकत्याच झालेली विधानसभा निवडणूक निष्पक्ष आणि शांततापूर्ण वातावरणात पार पडण्यासाठी सुरक्षा दलांनी पोलिसांशी समन्वय राखला होता असेही त्यांनी सांगितले.

## लाडकी बहीण योजनेचे अर्ज भरण्यासाठी पुन्हा मुदतवाढ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्य सरकारने लाडकी बहीण योजनेचे अर्ज भरण्यासाठी पुन्हा एकदा मुदतवाढ दिली आहे. त्यानुसार आता १५ ऑक्टोबरपर्यंत महिलांना लाडकी बहीण योजनेचे अर्ज भरता येणार आहे. पण ही मुदतवाढ देताना सरकारने यात एक मोठा बदल केला आहे. हे अर्ज फक्त अंगणवाडी सेविकांमार्फतच भरण्यात यावेत, अशी सूचना सरकारकडून देण्यात आली आहे.

या निर्णयानंतर आता ज्या महिलांचे अर्ज अद्यापही भरायचे बाकी आहेत, त्या महिलांना दिलासा मिळाला आहे. राज्य सरकारने यापूर्वी लाडकी बहीण योजनेचे अर्ज भरण्यासाठी ३० सप्टेंबरपर्यंतची मुदत दिली होती. त्यानुसार, लाखो महिलांनी त्यांचे अर्ज सादर केले होते. तसेच ज्यांनी ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये अर्ज सादर केले त्या महिलांना योजनेचा लाभही मिळाला. दरम्यान, सरकारने अर्जकरण्याची मुदत आता १५ ऑक्टोबरपर्यंत वाढवली आहे. त्यामुळे महिलांना अर्ज करण्यासाठी पुन्हा एक संधी मिळाली आहे. महिलांकडून सरकारच्या या निर्णयाचं स्वागत केलं जातं आहे.

राज्य सरकारने यंदाच्या अर्थसंकल्पात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची घोषणा केली होती. तसेच रक्षाबंधनाच्या मुहूर्तावर या योजनेच्या पहिल्या हफ्याही महिलांच्या खात्यात जमा केला होता. तेव्हापासून आजपर्यंत जवळपास २ कोटी ३० लाख महिलांना या योजनेचा लाभ मिळाल्याची माहिती सरकारकडून देण्यात आली आहे.

## अभिनेते सयाजी शिंदे यांचा अजित पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : विधानसभेची निवडणूक तोंडावर आल्यामुळे राज्याच्या राजकारणात अनेक घडामोडींना वेग आला आहे. पुढील काही दिवसांमध्ये निवडणुकीची आचारसंहिता जाहीर होणार आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्वच पक्षांचे नेते जोरदार कामाला लागले आहेत. अनेक नेत्यांकडून मतदारसंघात मोर्चेबांधणी सुरु असून सभा, मेळावे घेण्यात येत आहेत. यातच ऐन निवडणुकीच्या तोंडावर अनेक नेते, एका पक्षातून दुसऱ्या पक्षात प्रवेश करत असल्याचंही पाहायला मिळत आहे. असे असतानाच आता अभिनेते सयाजी शिंदे यांनी आज (११ ऑक्टोबर) राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात प्रवेश केला आहे.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांची आज मुंबईत पत्रकार परिषद पार पडली. या पत्रकार परिषदेमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल आणि छगन भुजबळ यांच्या उपस्थितीत अभिनेते सयाजी शिंदे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात जाहीर पक्ष प्रवेश केला. अभिनेते सयाजी शिंदे हे आता पक्षाचे स्टार प्रचारक म्हणून काम करणार आहेत.

अभिनेते सयाजी शिंदे यांनी हिंदी, मराठी तेलगू आणि तमिळ चित्रपटांमध्ये काम केलेलं आहे. तसेच ते गेल्या काही वर्षांपासून सामाजिक क्षेत्रातही कार्यरत होते. सयाजी शिंदे यांनी लाखो झाडे लावत सह्याद्री देवराई उभे केलेलं आहे. त्यांच्या या सामाजिक कार्याची राज्यभरात चर्चाही झाली. मात्र, सामाजिक कार्यानंतर आता सयाजी शिंदे यांनी राजकारणात प्रवेश करत अजित पवारांच्या उपस्थितीत घड्याळ हाती बांधलं आहे. या पक्ष प्रवेशावेळी मंत्री छगन भुजबळ यांनी अभिनेते सयाजी शिंदे यांचं कौतुक केलं. भुजबळ म्हणाले, आता उद्या दसरा आहे. पण आम्हाला आजच दसरा साजरा करण्याचं भाग्य लाभलं. खरं तर महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर सयाजी शिंदे यांनी आपल्या कामाने मोठा ठसा उमटवला आहे. त्यांनी मराठी, हिंदी आणि दाक्षिणात्य अशा विविध भाषेच्या चित्रपटांमध्ये अभिनय केला. ते अभिनेते आहेतच, पण आता ते नेते देखील झाले आहेत. सयाजी शिंदे यांनी सामाजिक क्षेत्रात मोठं काम केलं आहे. राज्यात ठिकठिकाणी वृक्षारोपण त्यांच्या माध्यमातून करण्यात आलेलं आहे, असं म्हणत मंत्री छगन भुजबळ यांनी सयाजी शिंदे यांचं कौतुक केलं.

### उच्च न्यायालयाकडून सरकारची कानउघाडणी

### तत्कालीन अधिकाऱ्यांची चौकशी

## पोलीस ठाण्यात ठेवलेले पुरावे उंदरांनी खाल्ले...;

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदूर : पोलीस ठाण्यात ठेवलेले पुरावे उंदरांनी खाल्ल्याचे पोलिसांनी सांगताच मध्य प्रदेश उच्च न्यायालयाच्या इंदूर खंडपीठाने प्रशासनाची कानउघाडणी केली. पोलिस ठाण्यांतील अशा साठवणूक कक्षांच्या दुरवस्थेबाबत तीव्र नाराजी व्यक्त करतानाच त्यांची देखभाल सुनिश्चित करण्याचे निर्देश खंडपीठाने अधिकाऱ्यांना दिले.

पाऊस पडत असल्याने साठवणूक कक्षात शिरलेल्या उंदरांनी एका खटल्याशी संबंधित विसेरा ठेवलेले प्लास्टिकचे डबे कुरतडल्यामुळे पुरावे नष्ट झाले. अन्य २८ नमुनेही उंदरांनी नष्ट केले. त्यामुळे या नमुन्यांचा हिस्टोपॅथोलॉजिकल अहवाल मिळू शकला नाही, असे विजय नगर पोलिसांनी उच्च न्यायालयाला सांगितले.

पोलिसांच्या या उत्तराबद्दल न्या. सुबोध अभ्यंकर यांच्या खंडपीठाने तीव्र नाराजी व्यक्त केली. तपासादरम्यान जप्त केलेल्या वस्तूंचे संरक्षण करण्यासाठी पोलिस अधिकाऱ्यांनी सर्व संबंधित बाबी विचारात घेतल्या पाहिजेत, असे न्यायालयाचे मत असल्याचे खंडपीठाने स्पष्ट केले. 'घडून गेलेल्या गोष्टींबाबत आता विचार करण्यात काही अर्थ नसला तरी तपासादरम्यान जमा झालेले साहित्य राज्यातील पोलिस ठाण्यांमध्ये कशा दयनीय अवस्थेत ठेवले जाते, हे तरी या घटनेने समोर आले आहे. सद्य परिस्थितीत इंदूर शहरातील सर्वांत वर्दळीच्या पोलिस ठाण्यांपैकी एक असलेल्या पोलिस ठाण्याची ही अवस्था असताना छोट्या-छोट्या ठिकाणच्या पोलिस ठाण्यांच्या परिस्थितीची आपण कल्पनाच करू शकतो,' अशा शब्दांत त्यांनी संताप व्यक्त केला.

या पार्श्वभूमीवर भविष्यात अन्य




पोलिस ठाण्यांमध्ये अशा घटना होऊ नयेत, यासाठी राज्यातील सर्व पोलिस ठाण्यांमधील साठवणूक कक्षात ठेवण्यात आलेल्या सामानाची सद्यस्थिती जाणून घेण्याचे निर्देश खंडपीठाने राज्याच्या पोलिस महासंचालकांना दिले. प्रत्येक महिन्यात अशा वस्तूंची नवीन यादी करणे व साठवणूक कक्षांची स्थिती अद्ययावत करण्यासाठी पोलिस ठाण्यांना एक वेबलिंक पाठवली जाऊ शकते. त्यामुळे पोलिसही या साठवणूक कक्षाच्या देखरेखीबाबत सतर्क राहतील, असा उपाय उच्च न्यायालयाने सुचवला.

विजय नगर पोलिस ठाण्यात ठेवलेला विसेरा आणि २८ अन्य नमुने उंदरांनी नष्ट केल्याप्रकरणी पोलिस ठाण्याचे तत्कालीन अधिकारी आणि साठवणूक कक्षाचे प्रभारी यांच्याविरुद्ध विभागीय चौकशी सुरू असल्याचे पोलिसांनी न्यायालयाला सांगितले. तसेच, साठवणूक कक्षातील सामान अन्य खोल्यांमध्ये ठेवताना अधिक काळजी घेतली जात असल्याचेही पोलिसांकडून न्यायालयाला सांगण्यात आले.

## टाटा ट्रस्टच्या अध्यक्षपदी नोएल टाटा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : ज्येष्ठ उद्योगपती रतन टाटा यांच्या निधनानंतर टाटा ट्रस्टच्या अध्यक्षपदाची जाबाबदारी नोएल टाटा यांच्याकडे सोपवण्यात आलेली आहे. रतन टाटा यांचे सावत्र भाऊ आणि नवल टाटा यांच्या दुसऱ्या पत्नीचे चिरंजीव नोएल टाटा यांचे नाव टाटा समूहाचे वारसदार म्हणून आघाडीवर होते. नोएल हे सध्या ट्रेंट लिमिटेड आणि टाटा इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशनचे अध्यक्ष, टाटा इंटरनॅशनलचे व्यवस्थापकीय संचालक, टाटा स्टील आणि टायटन कंपनीचे उपाध्यक्ष आहेत.



दिवंगत रतन टाटा यांच्या उत्तराधिकाऱ्याची नियुक्ती करण्यासाठी टाटा ट्रस्टने शुक्रवारी सकाळी एक बैठक बोलावली होती. या बैठकीत नोएल टाटा यांच्याकडे टाटा ट्रस्टची जबाबदारी देण्याचा निर्णय घेण्यात आला. नोएल टाटा हे आधीपासून सर दोराबजी टाटा ट्रस्ट आणि सर रतन टाटा ट्रस्टमध्ये विश्वस्त आहेत. त्यांच्याकडे टाटा सन्सची ६६% मालकी आहे. नोएल टाटा यांनी यूकेच्या ससेक्स विद्यापीठातून पदवी प्राप्त केली आहे. याशिवाय त्यांनी फ्रान्सच्या इनसीड बिझनेस स्कूलमधूनही शिक्षण घेतले आहे. नोएल टाटा यांनी टाटा सन्समधील सर्वात मोठे भागधारक आणि सायरस मिस्त्री यांचे वडील पालोनजी मिस्त्री यांची मुलगी आलू मिस्त्री यांच्याशी लग्न केले आहे. ज्येष्ठ उद्योगपती रतन टाटा यांच्यानंतर टाटा समूहाचे नेतृत्व कोण करणार, याबाबतीत चर्चा अनेक वर्षांपासून रंगत आली होती. रतन टाटा यांच्याकडे वैयक्तिकरीत्या तीन हजार ८०० कोटींची मालमत्ता आहे. टाटा यांच्या एकूण उत्पन्नापैकी ६६ टक्के भाग हा टाटा ट्रस्ट व त्याअंतर्गत येणाऱ्या कंपन्यांमधून येतो. टाटा ट्रस्ट हे टाटा सन्सचा भाग असून त्याअंतर्गत अनेक सामाजिक उपक्रम राबविले जातात. रतन टाटा यांना मूलबाळ नसल्याने वारसदार म्हणून टाटा घराण्यातील काही नावे चर्चेत होती. नोएल टाटा हे रतन टाटा यांचे सावत्र भाऊ आहेत. रतन टाटा यांचे वडील नवल टाटा यांनी दोनदा लग्न केले होते.

## संपादकीय....

### पुन्हा रेल्वे अपघात

तमिळनाडूतील तिरुवल्लूर जिल्ह्यातील कावरपेट्टई रेल्वे स्थानकावर दरभंगा एक्सप्रेसने मालगाडीला धडक दिली आहे. या अपघातात दरभंगा एक्स्प्रेसचे तीन डबे रुळावरून घसरले आहेत. तसेच दोन डब्यांना आगही लागली आहे. शुक्रवारी ९ वाजताच्या सुमारास ही घटना घडली. दक्षिण रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार, या अपघातात कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र, यात काही प्रवासी जखमी झाले आहेत. त्यांना जवळच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार मालगाडी कावराईपेट्टई रेल्वे स्थानकावर उभी असताना दरभंगा एक्स्प्रेसने मागून या मालगाडीला धडक दिली. यात एक्स्प्रेसचे तीन डबे रुळावरून खाली घसरले. तसेच दोन डब्यांना आग लागली. ही एक्स्प्रेस म्हैसूरवरून दरभंगाच्या दिशेने जात होती. या अपघाताची माहिती मिळताच, रेल्वे पोलीस आणि इतर अधिकारी तसेच अग्निशनदलाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. तसेच त्यांनी रेल्वेच्या डब्यांना लागलेली आग विझवण्याचे प्रयत्न केले. प्राथमिक माहितीनुसार, या अपघातात १० प्रवाशी जखमी झाले आहेत. तर मालगाडीचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. अग्निशमन दलाबरोबरच एनडीआरएफ तसेच एसडीआरएफचे पथकही घटनास्थळी दाखल झाले आहे. रेल्वे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एक्स्प्रेस गाडी तामिळनाडूच्या कावरपेट्टई येथे उभी असलेल्या गाडीला धडकली. या अपघातात अनेक जण जखमी झाले आहेत. घटनास्थळी मोठी आग लागली. अपघाताबद्दल मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, म्हैसूर-दरभंगा एक्स्प्रेस (१२५७८) ही गाडी एका मालगाडीला धडकली. अपघातात किती जण जखमी झाले आणि नेमकी परिस्थिती काय आहे याबाबत अद्याप रेल्वेकडून कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. तिरुवल्लूरचे जिल्हाधिकारी टी प्रभुशंकर यांनी सांगितले की, घटनास्थळी मदत कार्य वेगाने सुरू आहे. २०२४ मध्ये ८ रेल्वे अपघात झाले आहेत. यातील अखेरचा अपघात पश्चिम बंगालमधील रंगापानी रेल्वे स्थानकाजवळ ३१ जुलै रोजी झाला होता. दोन मालगाडी रुळावरून घसरल्या होत्या.

# धम्मक्रांती ६८ झाली तरीही भरकटत चाललोय !

सिध्दार्थ गौतमाने आपल्या सर्वस्वाचा, सर्व सुखोपभोगाचा व राजसत्तेचा त्याग केला. हा प्रसंग म्हणजे भारतात त्या काळी उदयास येत असलेल्या एका नवीन समतावादी युगाची सुरुवात म्हणावी लागेल.

गौतमाच्या मनात असंख्य विचारांचे काहूर माजले होते. या गुंतरगुंतीच्या व दुख:दायक व क्लेशदायक या काहूरातून स्वत: मुक्त होणे, अखिल मानवाला मुक्त करणे, या काहूराचे उगमस्थान नष्ट करुन त्याचा लय करणे या बद्दल सतत चिंतन व प्रदीर्घ मनन करीत असतांना त्यांना दिसून आले की, मानवी जीवनात दु:खमय अर्वाचीन अज्ञान, अंधश्रध्दा, द्वेष, क्रोध, विषमता, शोषण अशा अनेक प्रवृत्ती आहेत. या समस्यांचे उच्चाटन करण्याचा परिणामकारक व प्रभावी मार्ग शोधून काढला पाहिजे. त्यांचा एकच ध्यास त्यांना लागला होता. त्यांना खात्री होती की, एकदा का नाविण्यपूर्ण मार्ग सापडला व त्याचा उपयोग प्रामाणिकपणे आणि सचोटीने केला तर अखिल विश्वातील सर्व प्राणीमात्रांची दु:खातून मुक्तता होईल, त्यांचे कल्याण होईल, त्यांची सर्वांगीण प्रगतीही होईल. इतकेच नव्हे, तर समता, स्वातंत्र्य, बंधुत्व व न्याय या नैतिक मुल्यांवर आधारलेल्या एका उच्चतम मानवी संस्कृतीचा उदय होईल. सिध्दार्थाचा गृह त्याग म्हणजेच मानवी संस्कृतीच्या प्रदेशात जाण्याचे जणु एक महाद्वारच होते, असे म्हणावे लागेल.

भगवान बुध्दाने सारनाथ येथील मृगदयावनात बुध्दत्व प्राप्ती नंतर थोडया दिवसांनी जो प्रथम धम्मोपदेश केला, त्याला धम्मचक्र प्रवर्तन म्हटल्या गेले. मानवी जीवनातील दु:ख समुळ नष्ट करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे, अष्टांगीक मार्ग, सदाचाराचा, सद्गुणा-चा मार्ग, जो तथागताने संपूर्ण जगाला दिला.

२५०० वर्षा पूर्वी भारतातुन लोप पावलेला बौध्द धम्म परमपूज्य बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महाप्रयासामुळे व दृढनिश्चयी नेतृत्वामुळे या देशात १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागनगरीत अवतीर्ण झाला. या दिवशी या महामानवाच्या जाहीर आदेशानुसार वंचितांना जगण्याचे बळ देत गुलामगिरीत जखडलेल्या शेकडो पिढयांचे मुक्तिदाता ठरलेले भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार न देणारा हिंदूधर्म नाकारत बुध्दधम्म घेऊन, जागतिक धम्म प्रवर्तन केले. भारतीय समाजाने (बहुसंख्य अस्पृश्य) एवढया प्रचंड अगणित संख्येने बुध्दधम्माचा स्वीकार करणे ही मानवांची एक उत्क्रांत अवस्था आहे असे मानले जाते.

बौध्द धम्माने पुन:श्च या देशात पदार्पण करण्याची ही ऐतिहासिक घटना महाराष्ट्रात घडून आल्याने महाराष्ट्र भूमी धन्य-धन्य झाली, पुनीत झाली. सम्राट अशोका नंतर महान दिव्य-भव्य अशी धम्मक्रांती डॉ बाबासाहेबांनी घडवून आणली. सर्व प्रकारचे शोषण नाकारले. प्रज्ञा, शील, करुणेचा मानवतावाद सांगीतला. बुध्दाचं तत्वज्ञान म्हणजे शांतपणे पण ठामपणे अन्यायाला विरोध करणं आणि समानतेसाठी लढणं हेच ध्येय आहे.

महाराष्ट्रातील पुर्वाश्रमी अस्पृश्य गणल्या जाणाया सर्वच समूहाची अथवा अस्पृश्येतर लोकांनी या पवित्र धर्माचा स्वीकार केला नसला तरी, ज्या समाजाने बौध्द धम्माचा स्वेच्छेने स्वीकार केला आहे त्या समाजाला आपल्या अस्मितेची पूर्ण जाणीव झाली आहे. त्या समाजाने बौध्द धर्माचा स्वीकार करुन इतर समाज बांधवांच्या निदर्शनात आणून दिले की, जो समाज इतरांची गुलामगिरी स्वीकारुन लाचारीचे जीवन जगण्याचे नाकारतो, त्याच समाजाची शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक अशा ती-नही बाजुने सर्वांगीण प्रगती होत असते झा-लीच आहे. तो समाज उन्नतीच्या शिखरावर पोहचत असतो पोहचला सुध्दा. परंतू शोकांतिका अशी आहे की, आज समस्त बौध्द समाजामध्ये धम्म आचरणाच्या बाबतीत दुबळेपणा जाणवतो. त्यांच्या मनात एक प्रकारची उदासीनता आढळून येते. त्यामूळे धम्मश्रध्दा वृध्दींगत होण्यास वाव मिळत नाही. याची कारण मिमांसा करण्याची गरज आहे.

**प्रभाकर सोमकुवर**
**नागपूर, भ्रमणध्वनी क्र. ०९५९५२५५९५२**

धर्मांतर होवून ६८ वर्षे लोटत आ-हेत, तरीही बौध्द समाजातील असंख्य बौध्द अनुयायी आपल्या अज्ञानातच धुंद आहेत. आज दीक्षांतरीत बौध्द समाज देव-देवस्की, मंत्र-तंत्र, बुवा-बावांच्या नांदी लागलेला दिसत नसता, तर तो विज्ञानवादी बुध्द-धम्माच्या तत्वाप्रमाणे आचरण केले असते. बौध्द समाजाची स्थिती ती आज आहे त्यापेक्षा कितीतरी पटीने जास्त प्रमाणात प्रगती झाली असती. तो नावाने बौध्द नसुन आ-चार-विचाराने बौध्द झाला असता. तसे पाहिले तर यामध्ये जून्या चाली-रितींना पूर्ण आहारी गेलेल्या अशिक्षित लोकांचा भरणा तर आहेच, परंतु सुशिक्षित लोकांचा भरणा देखील कमी नाही.

आजच्या समस्त बौध्द समाजाच्या वैशिष्टयापैकी सर्वात ठळक वैशिष्टय म्हणजे सुशिक्षित वर्गाची पराकोटीला गेलेली स्वार्थवृत्ती. आपसापसामधील मतभेद व एकमेंकांबद्दलची द्वेष भावना. सुशिक्षित लोकांनी निदान आपल्या भावी पिढीसाठी आपल्या समाजाचा मागील इतिहास विसरुन जाता कामा नये. कारण आपण आपल्या समाजाचा मागील इतिहास विसरलो तर आपल्या सारखे करंटे आपणच.

तेव्हा बौध्द बांधवांनी ही जाणीव ठेवावी की, आपल्याला जे वैभव लाभले आहे, ते केवळ डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या अथक परिश्रमामुळेच, त्यांच्या पुण्यांईनेच......एवढा तरी सर्वांनी आपल्या मनात सदैव कृतज्ञतेचा भाव ठेवावा. केवळ प्रतिमेला हार घालून त्यांच्या प्रतिमांसमोर मेणबत्या व अगरबत्या प्रज्वलित करुन भागणार नाही तर कृतज्ञतेची भावना ठेवून आपणांस जे काही



अल्पसे का होईना, वैभव प्राप्त झाले आहे. त्यांच्याच सहाय्याने इतरांना सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक बाबतीत प्रगतीच्या मार्गाने वाटचाल करण्यासाठी तन-मन-धनाने मदत करावी. बुध्द-धम्म संघ यांचे प्रती अधिक श्रध्दा, निष्ठा वाढविण्यासाठी प्रयत्नशील राहावे, तेव्हाच धम्मचक्राची गती वाढेल. एकीकडे कलबुर्गी येथे ५००० लोकांना धम्मदीक्षा कन्नड भाषेत २२ प्रतिज्ञा देण्याचं धाडस श्रीमती अंबिका लक्ष्मीकांत हुबळी यांनी केले. एवढया मोठया प्रमाणात दीक्षा देणारी ती भारतातील पहिली महिला आहे. दुसरीकडे आपण देवी-देवतांच्या मागे भरकटत चाललोय!

बौध्द धम्मावर अनेक नामवंत असे मराठी ग्रंथ सर्वसाधारण वाचकांना समजेल अशा साध्या सोप्या भाषेत प्रकाशित झालेले आहेत. या सर्वांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा भगवान बुध्द व त्यांचा धम्म हा वंदनीय ग्रंथ सर्व बौध्द अभ्यासकांनी व साहित्यिकांनी प्रमाणभूत मानलेला आहे आणि या ग्रंथाच्या आधारे अनेक बौध्द साहित्यिक व अभ्यासक आपल्या मौलिक विचारांद्वारे समाज प्रबोधनाचे कार्य करीत आहेत, त्यात आपण सुध्दा सामील व्हावे इतुकी बौध्द बांधवांकडुन अपेक्षा करायला काही हरकत नाही. तेव्हाच बौध्द धम्म शिगेला पोहचेल. धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या सर्वांना मंगलकामना !

# औसा तालुक्यातील अवैध धंद्द्याविरोधात युवा भिमसेनेच्या वतीने दिले निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव औसा शहरात व औसा तालुक्यातील अवैद्य धंदे मटका, दारू, गुटखा, तंबाखू, रजनीगंधा, जरदा, गोवा, विमल सर्रासपणे मोठ्या प्रमाणात औसा तालुक्यात व औसा शहरात पान मटेरियल किराणा दुकानात टपरी वरती गुटखा विकला जात आहे.



मटका घेतला जात आहे वारंवार निवेदन देऊन व जिल्हाधिकारी कार्यालयासमोर युवा भीमसेनीच्या महिला अध्यक्ष उषाताई आदमने यांनी ६ दिवसाचा आमरण उपोषण करून देखील सर्रासपणे मोठ्या प्रमाणात औसा शहरात व औसा तालुक्यात अवैध धंदे चालू आहेत गावागावात दारू पार्सल करणाऱ्या दुकानांचे ठिकाण बस डेपो समोरच्या बाजूला व गुटखा विकणाऱ्या मटका घेणाऱ्या वरती कडक कारवाई करून यांना हद्दपार करण्यात येणे बाबत औसा शहर व औसा तालुक्यातील खुलेआम गुटखा अवैध्यरित्या गुटखा विमल ,जर्दा ,रजनीगंधा, गोवा ,तंबाखू, पान मटेरियल, पान टपरी किराणा दुकानांमध्ये विक्री केली जात आहे शासनाने गेल्या दहा वर्षांपासून महाराष्ट्रामध्ये गुटखा बंदी करून देखील औसा शहर व औसा तालुक्यात गुटखा खुलेआम पान टपरी वरती विकला जात आहे.

पान मटरेल चे गोडाऊन गच्च भरलेले असतात तरुण व्यक्तीमध्ये कॅन्सरचे प्रमाण ८० टक्के वाढलेले असून लातूर जिल्ह्यामध्ये कॅन्सर हॉस्पिटलमध्ये भेट दिली तर सगळ्यात जास्त युवा पिढी दिसून येईल व दारूमुळे व मटक्यामुळे गुन्हेगारी क्षेत्रामध्ये वाढ होत आहे व मटक्यामुळे गोरगरिबांचे संसार रस्त्यावर आले आहे तरी मा. उ. पो. अधीकारी यांना निवेदन देण्यात आले निवेदनाची दखल घ्या अन्यथा युवा भिमसेनेच्या वतीने आपल्या कार्यालयासमोर मटका खेळू व गुटखा दारू विक्री आंदोलन करण्यात येईल असं निवेदन देण्यात म्हंटले आहे

# श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवानिमित्त श्रींची प्रतिमा, पोथी व विणाची मिरवणूक



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शिर्डी/प्रतिनिधी राहुल फुंदे : श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवानिमित्त प्रथम दिवशी श्रींची प्रतिमा, पोथी व विणा-ची मिरवणूक काढण्यात आली. यावेळी मा.जिल्हाधिकारी तथा संस्थानचे मा. तदर्थ समिती सदस्य श्री.सिध्दाराम सालीमठ यांनी पोथी, मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी विणा घेऊन तर कृषी अधिकारी अनिल भणगे व मुख्याध्यापक कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय गंगाधर वरघुडे यांनी प्रतिमा घेवून सहभाग घेतला. यावेळी संस्थानचे प्र. उप मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी संदीपकुमार भोसले, प्रशासकिय अधिकारी प्रज्ञा महांडुळे - सिनारे, मंदिर प्रमुख विष्णु थोरात, मंदिर पुजा-री, शिर्डी ग्रामस्थ व साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सवानिमित्त श्री साईसच्चरित्र या पवित्र ग्रंथाच्या अखंड पारायणास सुरवात झाली. यावेळी प्रथम अध्यायाचे वाचन करताना संस्थानचे तदर्थ समितीचे सदस्य तथा जिल्हाधिकारी सिद्धराम सालीमठ.

# ज्योती ताई फडतरे यांची बोपगाव गावच्या सरपंच पदी बिनविरोध निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर/प्रतिनिधी : बोपगाव च्या सरपंच सौ प्रियंका शामराव फडतरे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या जागेवर सरपंच पदाची निवडणूक झाली. गावामध्ये ठरल्याप्रमाणे एकमेव अर्ज आल्याने त्यामध्ये सौ ज्योती ताई कुंडलिक फडतरे यांची सरपंच पदी बिनविरोध निवड झाली. तसेच श्रीमती सुवर्णा मधुकर जगदाळे यांचीही उपसरपंच पदी निवड झालेली आहे.



निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून श्री सुहास कांबळे मंडल अधिकारी सासवड, यांनी काम पाहिले तसेच सौ राखी ढगारे ग्रामसेविका बोपगाव, व श्री कल्पेश कटारे तलाठी भाऊसाहेब बोपगाव,यांनी त्यांना सहकार्य केले. निवड झाल्यानंतर सरपंच सौ ज्योती कुंडलीक फडतरे यांनी सांगितले की संपूर्ण गावाने माझ्यावर विश्वास ठेवून मला जी सरपंच पदाची संधी दिली त्या संधीचं सोनं करून गावाच्या विकासासाठी मी माझा वेळ देईन प्रामुख्याने महिलांचे प्रश्न,पाणी प्रश्न,विविध प्रश्न,रस्ते इत्यादी कामावर भर देईल. या कार्यक्रमासाठी सरपंचांना शुभेच्छा देण्यासाठी उद्धव ठाकरे साहेब गटाचे पुरंदर तालुकाप्रमुख श्री अभिजीत जगताप,यांनीही सरपंच सौ ज्योती फडतरे यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या सदर कार्यक्रम प्रसंगी श्री योगेश नाना फडतरे माजी स्वीकृत सदस्य जि प पुणे, श्री दयानंद शेठ फडतरे संचालक डेक्कन को-ऑपरेटिव्ह बँक,तसेच श्री संदीप शेठ फडतरे संचालक नीरा मार्केट कमिटी व नवनाथ देवस्थानचे उपाध्यक्ष श्री दीपक शेठ फडतरे, सौ वनिता फडतरे अध्यक्ष -धर्मवीर मानव सेवा संघ महाराष्ट्र प्रदेश, उद्योजक सोपान शेठ कुंजीर,प्रकाश शेठ जगदाळे,रमेश फडतरे,बाळासाहेब फडतरे,माजी सरपंच रामभाऊ शेठ फडतरे,राम फडतरे,चेअरमन सोपान अश्रू फडतरे, अण्णा फडतरे,सोपान (काका )फडतरे, शिवाजी रघुनाथ फडतरे,शिवसेना नेते शांताराम जगदाळे, साहेबराव फडतरे, नंदू भाऊ फडतरे, शामराव फडतरे,मस्कु बाळू फडतरे, बाबू शेठ फडतरे,दादा जगदाळे,संदिपसेठ जगदाळे यांनी शुभेच्छा दिल्या. सरपंच पदाची निवडणूक झाल्यानंतर कानिफनाथ ढोल लेझीम मंडळ बोपगाव, सह पारंपारिक पद्धतीने गावातून मिरवणूक काढण्यात आली यामध्ये गावातील तरुणासह वयोवृद्ध सामील झाले होते तसेच या कार्यक्रमासाठी ग्रामपंचायत चे सर्व महिला सदस्य, सोसायटीचे चेअरमन त्यांचे सर्व सदस्य,नवनाथ देवस्थान ट्रस्ट चे सर्व संचालक मंडळ,पोलीस पाटील,गावातील सर्व तरुण मंडळाचे अध्यक्ष,तरुण वर्ग महिला भगिनी उपस्थित होते.

## निवासी शाळेतील विद्यार्थ्यांचा अनोखा उपक्रम

## मुख्यमंत्र्यांना लिहून पाठविले आभार पत्र

# मराठीला अभिजात दर्जा मिळाल्याने शासनाला विद्यार्थ्यांचे आभार पत्र...!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/गोदिंया : अनेक वर्षांपासून शासनाकडे राजमाषा मराठीला अभिजात दर्जा मिळावा असा उठाठेव सुरू होता. परंतु खूप वर्षाच्या प्रतीक्षेनंतर आता २०२४ यावर्षी शासनाने ठरविल्याप्रमाणे माय मराठी भाषेला अभिजात दर्जा देण्यात आला. ही अभिमानाची व आनंदाची बाब आहे. याच बाबीचे औचित्य साधून अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपूरा-मुर्री येथील विद्यार्थ्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आभार पत्र लिहून शासनाला पोस्टाद्वारे पाठवून आभार मानले आहे.


सदर आगळावेगळा उपक्रम या शाळेतील मराठी भाषेचे शिक्षक, कवी, लेखक व अभ्यासक मुन्नाभाई नंदागवळी यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आला. अनेक प्रकारचा वेगवेगळ्या स्तरावरून मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा म्हणून प्रयत्न सुरू होता. याला बराच काळ लागला. अनेक मराठी साहित्य लिहीणारे साहित्यिक मंडळींनी या प्रयत्नाला चांगलाच हातभार लावला होता आणि तो सोन्याचा दिवस उजाडून दर्जा प्राप्त झाला.

मराठी भाषा फार पूर्वीची आहे. या भाषेला बराच काळ लाभला आहे. या सर्व गोष्टींचे भान ठेवून मराठी भाषेचे सामर्थ्य वाढवावे म्हणून वर्ग नववीच्या प्रत्येक विद्यार्थ्यांनी आभार पत्र लिहून पाठविले आहे. या पत्रात विद्यार्थ्यांनी स्वतः हस्ताक्षरात लिहिले. यामध्ये मराठी भाषेचा गौरव व्हावा. मराठी भाषा ही आईच्या ठिकाणी आहे. मराठीची गोडवी फार रुचकर आहे. मराठीने अनेक भाषेतील शब्दांना माया लावली आहे. जवळजवळ ३७ भाषांचे शब्द या माय मराठीने जपले आहे.

साहित्य क्षेत्रात मराठीचा व्याप हा ग्रामीण भागातील बोली भाषेपासूनचा तर प्रमाणशीर भाषेपर्यंत व्यापला आहे. समृद्ध अशी भाषा दुसरी नाही. अभिमान आहे. मराठी शिकण्याचा, बोलण्याचा तसेच मराठी असण्याचा...! शासनाने अभिजात दर्जा देण्याबरोबरच मराठी शिक्षणाच्या शाळा पुन्हा निर्माण कराव्या. मराठी शाळा ही देशाचा व भाषेचा अभिमान आहे. मराठी शाळा नसल्या तर मराठी भाषा रसातळाला जाऊ शकते असाही अंदाज व्यक्त केला जातो.

### उपक्रमात सहभागी विद्यार्थी

**हेमंत लाडे, यश वालदे, तुषार साऊस्कार, लोकेश मेश्राम, तन्मय साऊस्कार, कुणाल मेश्राम, संचित शहारे, सागर कोहरे, प्रियंशू जनबंधू, नैतिक कुडवे, धम्मदीप खोब्रागडे, आयुष जांभूळकर, अनमोल भेलावे, ममीत वालदे, पृथ्वीराज भोगारे, आर्यन सोनवणे, सुजित वालदे, दक्ष मेश्राम, चेतन चौधरी, विकास कराडे, सारस गजभिये, आर्यन शहारे, करण शहारे, आशिष शामकूरे, चैतन्य जनबंधू व यशकुमार तांडेकर या विद्यार्थ्यांनी आभार पत्र लिहून पाठविले.**



सदर उपक्रमात ३८ विद्यार्थी सहभागी होऊन संपूर्ण आभार पत्र तयार करण्यात आले. आभार पत्रातून विद्यार्थ्यांनी आपली भाषेविषयी कृतज्ञता व्यक्त केली. यातून भाषेविषयी असणारे प्रेम व जिव्हाळा आणखीनच द्विगुणित झाल्याचे दिसते. कविता, कथा, कादंबरी, नाटक, निबंध, प्रवासवर्णन, पत्रलेखन, बातमी, एकतृतीयांश, सारांश लेखन, जाहिरात लेखन, श्रुतलेखन अशाप्रकारे हा सर्व अभ्यासक्रमाचा उपयोजित लेखन प्रकाराचा भाग आहे. त्यामुळे या आभार पत्राने विद्यार्थ्यांचे मनोधैर्य फारच उंचावले असा विश्वास व्यक्त होतो.

**नवनवीन उपक्रम राबवून विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची आवड यावी, शिक्षणातून सर्वांगीण विकास साधायचा आहे. मराठी भाषेला आणखीन उंचीवर न्यायचा निर्धार करून माझ्या ही संकल्पना आली आणि मी लगेच विद्यार्थ्यांसह राबविली. याला उत्तम प्रतिसाद दिला. नवनवीन प्रयोग किंवा उपक्रम हा माझा स्वभाव बनला आहे. पूढे नवा प्रयोग करण्यासाठी सज्ज आहे.**

**– मुन्नाभाई नंदागवळी** (भाषा शिक्षक, कवी व अभ्यासक) अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलांची शासकीय निवासी शाळा नंगपूरा-मुर्री.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### माहेरून नऊ लाख रुपये घेऊन ये म्हणत विवाहितेचा छळ

सोलापूर, (प्रतिनिधी) : विवाहिता ही सासरी नांदत असताना सासरकडच्या मंडळींनी शारीरिक व मानसिक छळ करत वेळोवेळी मारहाण केली त्यानंतर शिवीगाळ करत माहेरून नऊ लाख रुपये आण नाहीतर तुला नांदवणार नाही अशी धमकी दिल्याची फिर्याद फातिमा महिबूब शेख (वय-३७,रा.मु.पो.मूडलगी,जि.बेळगाव) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून पती महिबूब शेख,बडीमाँ मरेसाब शेख,इंदिरा शेख व नबी शेख (सर्व.रा.मुपो.मूडलगी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. ही घटना १ ऑक्टोंबर २०२४ ते ९ ऑक्टोंबर २०२४ दरम्यान मूडलगी, बेळगाव येथे घडली. या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार साळुंके हे करीत आहेत.

### सोन्याचे फुलझुबे असलेली पिशवी पळवली

सोलापूर, (प्रतिनिधी) : चाटी गल्लीतील पवार साडी सेंटर येथे फिर्यादी संगीता अरविंद मडीवाळ (वय-३२-,रा.तेलंगी पाच्छा पेठ) यांच्या जवळ असलेली पिशवी त्यामध्ये पंचवीस हजार रुपये किमतीचे पाच ग्रॅम सोन्याचे फलझुबे होते. अज्ञात चोरट्याने त्यावेळी ती पिशवी फिर्यादी यांच्या सहमती वाचून चोरून नेली आहे. ही घटना ९ ऑक्टोबर रोजी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास पवार साडी सेंटर चाटी गल्ली येथे घडली.याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला असून, या घटनेचा पुढील तपास पोलीस हवालदार आरेनवरु हे करीत आहेत.

### चहा कॅन्टींगचा पत्राशेड फोडून गॅस शेगळीसह सिलेंडर लंपास

सोलापूर, (प्रतिनिधी) : अक्कलकोट रोड मूकबधिर शाळेच्या जवळ असलेल्या कॅन्टींगचा पत्रा शेड फोडून आत मधील एक स्टील गॅस शेगडी व गॅस सिलेंडर चोरून नेल्याची घटना ७ ते ८ ऑक्टोंबर दरम्यान घडली.याप्रकरणी विजय विश्वनाथ नंदीकोल (वय-४९,रा.ज्ञानेश्वर नगर,अली महाराज मठाजवळ) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार उबाळे हे करीत आहेत.

### अज्ञात चोरट्याने अशोक नगरातून दुचाकी पळवली

सोलापूर, (प्रतिनिधी) : अशोक नगरातून एका उसाच्या रसाच्या दुकानासमोर हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एम.एच.१३.बीके.७६०९ हे अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना ८ ऑक्टोंबर रोजी सकाळी नऊ ते दहा वाजण्याच्या दरम्यान घडली. याप्रकरणी सतीश देविदास सामल (वय-३२,रा.बी ग्रुप विडी घरकुल) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल राठोड हे करीत आहेत.

# नववी माळ : रूक्मिणी मातेस पारंपारिक श्री दुर्गा देवीमाता पोशाख सह अलंकार परिधान

## नवरात्र महोत्सव: श्री विठ्ठलास अलंकार परिधान




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधीः घटस्थापनेपासून नवरात्र महोत्सवास सुरवात होत आहे. या निमित्त दुपारी दरवर्षी प्रथा परंपरेप्रमाणे सातव्या दिवशी श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला पारंपारिक पोषाखासह अलंकार परिधान करण्यात आले आहेत. त्यामध्ये रूक्मिणी मातेस श्री.दुर्गा देवीमाता पोशाख परिधान करण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी दिली. श्री विठ्ठलास सोन्याचा मुकुट, कौस्तुभ मणी, बालाजी नाम, दंडपेठ्या जोड, हिऱ्यांचे कंगन, मोत्यांचा तुरा, शिरपेच लहान, शिरपेच मोठा, मत्स्य जोड, तुळशीची माळ, एक दानी, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, तोडेजोड, बदाम लॉकेट, मोहरम ाळ, शाळीग्राम हार, हायकोल, लक्ष्मीहार इ.

तसेच रुक्मिणी मातेस जडवाचा मुकुट, जडवाचा हार, जडवाचे बाजूबंद जोड, खड्यांची वेणी, पाचूची गरसोळी ,चिंचपेटी पांढरी, हातसर जोड, तनमई मोठा, मासपट्टा, तुळशीची माळ एक पदरी, शिंदे हार पूर्ण पाच पदरी, जडावाचे ताणवट जोड, चंद्र, सूर्य, मोत्यांचा कंठा, बाजीराव गरसोळी, पेठेंची बिंदी, खड्यांच्या पाटल्या जोड, मोत्याचे मंगळसूत्र, मोत्याचा तुरा, मत्स्य जोड, रुळ जोड, पैंजण जोड, बाळ्या जोड, मोठी नथ, सोन्याच्या करंडा, वाक्याजोड, तोडेजोड इत्यादि अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत. तसेच राधिका मातेस नक्षी टोप, जवेची माळ, चिंचपेटी तांबडी, मोहरांची माळ, जवमनी पदक, ठुशी नवीन व सत्यभामादेवीला चांदीचा मुकुट, जवेच्या माळा, हायकोल, पुतळ्यांची माळ, लक्ष्मी हार, इत्यादी अलंकार व प्रथा परंपरेप्रमाणे पोशाख परिधान करण्यात आलेले आहेत. तसेच मंदिर समितीच्या अख्त्यातरीत असलेल्या पंढरपूर शहर व परिसरातील लखुबाई, अंबाबाई, पद्मावती, यल्लमादेवी, यमाई-तुकाई माता आदी परिवार देवतांना देखील पारंपारिक पोषाख तसेच दि. १२ ऑक्टोंबर रोजी विजया दशमी दसरा, दि.१३ ऑक्टोंबर रोजी शासकीय सुट्टी व दि.१४ ऑक्टोंबर रोजी भागवत एकादशी असल्याने भाविकांची मोठी प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता असल्याने दर्शनरांगेत कमांडोज नियुक्ती, पाणी, चहा व खिचडी वाटप, बॅरीकेटींगची व्यवस्था तसेच पुजांची संख्या कमी करून दर्शन वेळ वाढविणे व इतर अनुषंगीक पुरेसा प्रमाणात सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. तसेच रिध्दी - सिध्दी गणपती मंदिरात विजया दशमी दसरा दिवशी दरवर्षीप्रमाणे सिमोल्लंघन साजरे करण्यात येत आहे. त्या ठिकाणी देखील आवश्यक त्या सोई सुविधा पुरविण्यात येत असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली.

# मराठा मंदिर,मुंबई अध्यक्षपदी शरदचंद्र पवार यांची तर सरचिटणीसपदी दीपक देशमुख बिनविरोध निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट, (प्रतिनीधी) : येथील मराठा मंदिर, मुंबई या संस्थेच्या सन २०२४-२५ ते २०२६-२७ या त्रैवार्षिक कालावधीकरिता अध्यक्षपदी पुनश्च शरदचंद्र पवार यांची तर सरचिटणीसपदी दीपक देशमुख यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

मराठा मंदिर संचलित विद्यावर्धिनी, मुंबई या संस्थेच्या व मराठा मंदिर-ग्लोबल स्कूल रत्नागिरीच्या अध्यक्षपदी योगेश शशिकांत पवार यांची बिनविरोध निवड करण्यात आली.



मुंबई येथील मातृसंस्था मराठा मंदिरच्या नुतन पदाधिकाऱ्यांची बिनविरोध निवड नुकतीच करण्यात आली. बिनविरोध निवड करण्यात आलेल्या नूतन पदाधिकाऱ्यांची नावे व पदे पुढीलप्रमाणे आहेत.

अध्यक्ष- श्री.शरदचंद्र गोविंदराव पवार, उपाध्यक्ष- श्री.विलासराव भाऊराव देशमुख, उपाध्यक्ष- डॉ.शिवाजी आबाराव भोसले, उपाध्यक्ष श्री.दिलीप अर्जुन चव्हाण, सरचिटणीस- श्री.दीपक भाऊराव देशमुख, चिटणीस-श्री.राजेंद्र प्रताप गावडे, चिटणीस- श्री.योगेश शशिकांत पवार, चिटणीस-डॉ. नितीन श्रीकृष्ण विचारे, चिटणीस-श्री. पंकज कृष्णकांत घाग, खजिनदार- श्री.चंद्रकांत मुगुटराव खोपडे, खजिनदार- श्री.किशोर प्रभाकर देशमुख तसेच मराठा मंदिर संचलित विद्यावर्धिनी,मुंबई व मराठा मंदिर रत्नागिरी ग्लोबल स्कूल या दोन्ही संस्थेच्या अध्यक्षपदी योगेश शशिकांत पवार यांची निवड करण्यात आली. मराठा मंदिर संचलित विद्यावर्धिनीचे राज्यात मुंबई, रत्नागिरी, पाली, जत व अक्कलकोट येथे विविध शिशु, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, व्होकेशनल कॉलेज, रात्र शाळा आहेत तर मराठा मंदिर ग्लोबल स्कूल ही उच्च दर्जाची, अद्ययावत इंग्रजी माध्यमाची नामांकित सी.बी.एस.ई.शाळा आहे. मराठा मंदिर, तसेच मराठा मंदिर संचलित विद्यावर्धिनी व मराठा मंदिर-ग्लोबल स्कूल,रत्नागिरी यांच्या नूतन पदाधिकाऱ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.




## यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात प्लेसमेंट कॅम्प संपन्न

पंढरपूर, (प्रतिनिधी) : यशवंतराव चव्हाण महाविद्यालयत फिरशील फाउंडेशन व य. च. महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मनी वाईज वित्तीय साक्षरता प्रकल्पासाठी व डाटा एन्ट्री या पदासाठी १८ विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉक्टर एल बी पाटील महाविद्यालयात नेहमीच संसदीय सचिव विलासराव घुमरे रोजगार संधी उपलब्ध करून महाविद्यालय करत आहे. या सर्व संधीचा फायदा विद्यार्थ्यांनी घ्यावा असे आव्हान या कार्यक्रमासाठी हनुमंत भालेराव, समुपदेशक अविनाश शिंदे, प्लेसमेंट सेल प्रमुख प्रा कृष्णा कांबळे आय क्यू ए सी. समन्वयक डॉक्टर अंकुश करपे उपस्थित होते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी यशवंत महाविद्यालयातील सदस्य होते लाभले उपोषणाच्या आभार प्रा सुधीर मुळीक यांनी मानले.

# श्री साई श्रद्धा एज्युकेशन च्या वतीने वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांचा सत्कार




**दैनिक,यश सिद्धी न्यूज नेटवर्क.**

धाराशिव : सुधाकर रणदिवे, धाराशिव येथील साई श्रद्धा एज्युकेशनच्या वतीने २०२४ या शैक्षणिक वर्षात वैद्यकीय महाविद्यालय प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांचा नीट ऑनलाइन टेस्ट सिरीजच्या पाचव्या वर्धापन दिनाचे निमित्त साधून सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून श्री बाळासाहेब भोसले स्पेशल ऑडीटर वर्ग एक तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री. विशाल सूर्यवंशी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला श्री साई श्रद्धा एज्युकेशनचे संचालक प्रा. सोमनाथ लांडगे यांनी प्रस्तावना करताना श्री साई श्रद्धा एज्युकेशनने बदलत्या काळानुसार शिक्षण क्षेत्रामध्ये करत असलेल्या बदलाबाबत व चार वर्षात एकूणच वैद्यकीय महाविद्यालयामध्ये प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्याबाबत माहिती सांगून गोर गरीब विद्यार्थ्याला नीट ऑनलाइन टेस्ट सिरीज सोबतच अत्यंत माफक दरामध्ये मुलींचे वस्तीगृह सुद्धा उपलब्ध करून देत असल्याचे सांगितले. या नीट ऑनलाईन टेस्ट सिरीजचा स्वतःच्या मुलापासून सुरू केलेला प्रवास आता १६ जिल्ह्यापर्यंत पोहोचलेला आहे, हेही यावेळी आवर्जून सांगितले.

त्यानंतर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री विशाल सूर्यवंशी सर यांनी श्री साई श्रद्धा एज्युकेशन वैद्यकीय क्षेत्रातील पूर्व परीक्षा नीट मध्ये करत असलेल्या प्रगतीबद्दल तसेच संस्थेचे संचालक प्रा. सोमनाथ लांडगे यांच्या सामाजिक कार्याबद्दल अतिशय गौरवपूर्ण उल्लेख करून नवीन वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस शुभेच्छा देऊन भविष्यात वैद्यकीय व्यवसाय करताना सुद्धा सामाजिक भान जोपासण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचा समोर करत असताना श्री बाळासाहेब भोसले सर यांनी बदलत्या काळानुसार विद्यार्थ्यांने स्वतःमध्ये बदल करून घ्यावा व आव्हानाला सामोरे जावे तसेच आई वडील करीत असलेल्या कष्टाचे भान ठेवून स्वतःच्या विकासासोबतच राष्ट्र निर्माणाला सुद्धा अग्रगण्य स्थान द्यावे असे विद्यार्थ्यांना आव्हान केले.

यावेळी बोलत असताना भोसले साहेब म्हणाले प्रा. सोमनाथ लांडगे यांना मी कॉलेज जिवणापासून पाहतोय. अत्यंत गरिबीचे जीवन जगत जगत शिक्षण घेत असलेल्या हा व्यक्ती आजही या काळात जशाला तसाच मला दिसतोय. याचाही आपल्या भाषणामध्ये त्यांनी उल्लेख करून संस्थेच्या भविष्यातील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी एमबीबीएस, बीएएमएस, बीडीएस महाविद्यालयात प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सोलापूर येथे प्रवेशित झाल्याबद्दल प्रथम गांधी, शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय धाराशिव येथे प्रवेशित झाल्याबद्दल जानवी गरड, मुस्कान पठाण, अंजली कांबळे, तसेच इतर बीएएम एस कॉलेजमध्ये प्रवेश मिळाल्याबद्दल श्रेया भंडारे, निकिता गुंडरे, श्रीनिवास गिरी, काकडे नेहा, अपर्णा सुरवसे, भक्ती चौधरी, कल्याणी बचुटे, आगळे सानिका, ढेकणे वैष्णवी, पडवळ अमिषा, वाघमारे श्रावणी, गौरी ढवळे, तेजल तवले, एकता भोसले, सोनाली चित्राव, सुप्रिया भोसले, मानसी देडे, वैष्णवी कोरे व मुलांमध्ये श्रेयस गंगथडे, प्रवीण सावंत, सागर भक्ते व संघर्ष मस्के या विद्यार्थ्यांचा शाल व बुके देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी पालकांमध्ये विक्रम गरड, हरिश्चंद्र गुंडरे, अशोक कांबळे, सादिक पठाण, उत्तम काकडे, गणेश गंगथडे, नामदेव भाकरे, अनिल सुरवसे, संतोष चौधरी, बाळासाहेब सावंत, प्रमोद बचुटे, नेताजी आगळे, बालाजी भक्ती, अरुण ढेकणे, अनिल पडवळ, शशिकांत कोठावळे, सुरेश वाघमारे, धनराज ढवळे, रामानंद तवले, संताजी भोसले, राजकुमार मस्के, साधू भोसले हे पालक उपस्थित होते.


या कार्यक्रमाला संस्थेच्या संचालिका उषाताई लांडगे, पत्रकार प्रशांत सोनटक्के, श्रद्धा लांडगे, वस्तीगृहामधील विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. संस्थेचे संचालक श्री नागेश गोटे सर यांनी सर्व विद्यार्थी, पालक, प्रमुख पाहुणे यांच्या उपस्थितीबद्दल आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

**श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिर व्यतिरिक्त परिवार देवतांच्या मंदिराचे देखील पुरातत्व विभागा मार्फत संवर्धनाचे काम सुरू** — **कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके**

# श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरातील व्यंकटेश बालाजी मंदिर जिर्ण व कळस ढासळल्याने त्या ठिकाणी नव्याने निर्मिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर /प्रतिनिधी : श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिर व परिवार देवतांच्या मंदिराचे जतन व संवर्धनाचे काम पुरातत्व विभागाच्या मार्फत शासन निधीतून सुरू आहे. या आराखड्यातील पहिल्या टप्प्यातील कामांपैकी विठ्ठल गाभारा, रूक्मिणी गाभारा, बाजीराव पडसाळी व विठ्ठल सभामंडप येथील काम पूर्णत्वास आले आहे. तसेच श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरातील २६ परिवार देवता व शहरातील २८ परिवार देवतांच्या मंदिरांचे देखील जतन व संवर्धनाचे काम पुरातत्व विभागामार्फत सुरू आहे. त्यामध्ये प्रामुख्याने श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरातील महालक्ष्मी मंदिर व व्यंकटेश मंदिराचे संवर्धनाचे काम सुरू करण्यात आले आहे.



श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिर व परिवार देवतांच्या मंदिरांचे संवर्धन व जिर्णोद्वार आराखड्यातील पहिल्या टप्प्यातील कामांसाठी पुरातत्व विभागामार्फत ई निविदा राबविण्यात आली होती. त्यामध्ये मे. सवानी हेरीटेज कॉन्झर्वेशन प्रा.लि., मुंबई यांची ई निविदा मंजुर करण्यात आली आहे. या कामास शासनाने निधी उपलब्ध करून दिला असून, त्याचा उद्घाटन समारंभ कार्तिकी एकादशी २०२३ रोजी करून प्रत्यक्ष कामास दि.१६/१२/२०२३ पासून सुरवात करण्यात आली आहे.

सदर जतन व संवर्धनाची कामे करीत असताना, त्यामध्ये अनेक परिवार देवतांची मंदिरे व मंदिराचा कळस हा ढासळलेला होता. त्याची जतन व संवर्धनाची कामे तातडीने करणे आवश्यक होते. त्यामध्ये प्रामुख्याने महालक्ष्मी मंदिर व व्यंकटेश मंदिर व इतरही परिवार देवतांच्या मंदिरांचे काम सुरू करण्यात आले आहे. सदरचे काम सुरू करताना, त्याची विधिवत पुजा करून त्यानंतरच मुर्ती काढून जतन करून ठेवण्यात आलेल्या आहेत. अशाच पध्दतीने व्यंकटेश बालाजी मंदिरातील मुर्ती देखील विधिवत पुजा करून मुर्ती नित्योपचार विभागात जतन करून ठेवली आहे. या मंदिराची पाहणी पुरातत्व विभाग व मंदिर समितीने संयुक्तरित्या केली होती आणि त्या ठिकाणी मंदिर खुप जिर्ण झाले होते व त्याचा कळस ढासळलेला होता.

**श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिराच्या व परिवार देवता मंदिराच्या जतन व संवर्धन आराखड्यातील कामास गती देऊन सदरची सर्व कामे वेळेत चांगल्या गुणवत्तेची करावीत याचा वेळोवेळी मंदिर समिती आढावा घेत आहे. त्याची पुरातत्व विभाग, ठेकेदार व वास्तुविशारद यांच्या समवेत आढावा बैठक देखील रविवार दिनांक १३ ऑक्टोंबर रोजी आयोजित करण्यात आली असल्याचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी सांगीतले.**

त्यामुळे सदरचे मंदिर सध्या जिर्णोद्वारासाठी हाती घेतलेले आहे. त्याची मुर्ती जतन करून ठेवलेली आहे. सदरचे व्यंकटेश बालाजीचे मंदिर इतर ठिकाणी स्थलांतरीत न करता, त्याच ठिकाणी पूढील ६ ते ८ महिन्यामध्ये पूर्णपणे नव्याने निर्मित होईल व मुर्तीची विधिवत पूजा करून त्या ठिकाणी प्राणप्रतिष्ठापना केली जाईल. या मंदिरातील दगड व इतर अनुषंगीक साहित्यास नंबरींग करण्यात आले असून, त्यामधील चांगल्या दर्जाचे दगड पून्हा त्याच ठिकाणी बसविण्याचे नियोजन करण्यात येत आहे.

तरी भाविकांना मंदिर समितीच्या वतीने आवाहन करण्यात येत आहे, श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरातील व्यंकटेश बालाजीचे मंदिर इतर ठिकाणी स्थलांतरीत न करता, त्याच ठिकाणी पूढील ६ ते ८ महिन्यामध्ये पूर्णपणे नव्याने मंदिर निर्मित होईल. त्यामुळे भाविकांना पुढील काही दिवस व्यंकटेश बालाजीचे व इतर परिवार देवतांचे दर्शन घेण्यास विलंब लागू शकतो.

तसेच सदरची सर्व कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत पुरातत्व विभाग व ठेकेदारास सुचना देण्यात आलेल्या आहेत. भाविकांना व्यंकटेश बालाजीचे व इतर परिवार देवतांचे दर्शन लवकरात लवकर मिळावे, यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत, असे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगीतले.

दैनिक
यश सिद्धि न्यूज



## थोडक्यात...

### धमकी दिल्याप्रकरणी चौघांवर गुन्हा

सोलापूर : आंध्र नवरात्र महोत्सव तरुण मंडळातील महिला सदस्य अलकुंटे चौकात डान्स करताना त्याठिकाणी चौघांनी येऊन महिलासोबत डान्स करण्यास सुरुवात केली.त्यांना मंडळातील काही सदस्यांनी विरोध केला असता यातील चौघांनी आम्हाला डान्स करण्यापासून कोण रोखणार आहे. त्यास आम्ही जिवंत सोडणार नाही अशी धमकी दिल्याची घटना ३ ऑक्टोबर रोजी रात्री पावणे नऊ वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी सिद्राम चंद्रप्पा म्हेत्रे (वय-४०,व्यवसाय व्यापार, रा.घर नंबर ३७ प्रकाश बापूजी हाऊसिंग सोसायटी अलकुंटे चौक) यांनी सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्यादी दिली आहे. या पुढील तपास सदर बझार पोलीस करीत आहेत.

# भारतीय स्टेट बँकेच्या मॅनेजर यांचे ग्राहकांशी असभ्य वर्तन

## पासबुक छपाई व अन्य यंत्रणा नादुरुस्त अवस्थेत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट / प्रतिनिधी : दि. ११ भारतीय अर्थव्यवस्थे मध्ये सर्वात मोठी अशी समजली जाणारी भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया ही, बँक देशभरात सर्वात जलद गतीची बँक समजली जात असून, इकडे तालुक्यात मात्र वेगळेच पाहायला मिळत आहे. अक्कलकोट तालुक्यातील या भारतीय स्टेट बँकेचे खातेदार यांना तोंड दाबून बुक्क्याचा मार सहन करावा लागत आहे.

बँकेचे मॅनेजर हे ग्राहकांशी असभ्य वर्तन करत असल्याचे दररोज पाहायला मिळत असून, उद्धट बोलणे, अरेरावी बोलणे, तुम्हांला कुठं तक्रार करायची तिथे करा, मी कुणाला घाबरत नाही. माझं कोणीच काय करू शकत नाही. असे उद्धट बोलून ग्राहकांना धमकी वजा इशारा देताना अनेकांनी अनुभवले असून, बँकेत पासबुक छापन्याची मशीन वारंवार बंद अवस्थेत असते तर बँकेच्या कर्मचाऱ्याशी संपर्क केला असता. आमचा याच्याशी काय संबंध नाही. त्याचा इंजिनियर येईल व काम केल्यावर मशीन चालू होईल असे उडवाउडवी चे उत्तरे देतात. शिवाय विशेष धक्कादायक बाबा म्हणजे एटीएम चे तर नेहमीच तीन तेरा वाजलेले असतात. या बाबतीत विचारणा केली तर त्यामध्ये आणखीन कॅश भरायची आहे. असली शिल्लक कारणे देतात.

वीस हजार व काढणे व भरणे असल्यास चौकातल्या सीएसपी केंद्रावर जाऊन भरा अथवा काढा असे वयोवृद्ध नागरिकांना हे बँकेचे कर्मचारी सांगतात. मग हे काय बँकेत करतात...? हा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे. बँकेत आलेल्या प्रत्येक ग्राहकाला हे सांगतात ऑनलाईन व्यवहार करा. हा प्रश्न ग्राहकांचा आहे. ऑनलाईन करायचा कि ऑफलाईन, बँक कर्मचारी हे नेहमी कागद वाढवण्याचे काम सांगतात व टाळाटाळ करत असल्याची घटना प्रत्यक्षदर्शी सांगतात. अक्कलकोट भारतीय स्टेट बँकेत नेहमी ग्राहकां बाबतीत असाच प्रकार सरास पाहायला मिळत असून, या अतिशय गंभीर बाबीची दाखल घेऊन या असभ्य वागणाऱ्या




कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई व्हावी व स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी या बाबतीत लक्ष घालून या उद्धट वागणाऱ्या बँक मॅनेजरची तात्काळ बदली करून त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी अशी मागणी सर्वसामान्य जनतेतून होत आहे.

या गंभीर घटनेची दखल घेत काही ग्राहक हे थेट जिल्हाधिकारी सोलापूर, लीड ब्रँच सोलापूर, रिजनल हेड ब्रँच, मुंबई यांच्याकडे येत्या दोन दिवसात लेखी तक्रार करणार आहेत.

# महाराष्ट्र राज्य जनसेवा संघटनेची इंदापूर तालुका पत्रकार आघाडीची पद नियुक्ती व सत्कार समारंभ सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे

महाराष्ट्र राज्याचे जनसेवा संघटनेचे अध्यक्ष धवलसिंह प्रतापसिंह मोहिते पाटील व उर्वशीराजे धवलसिंह मोहिते-पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत इंदापूर येथे पार पडला.

यावेळी धवलसिंह मोहिते पाटील यांच्याकडून संघटनेची इंदापूर तालुका पत्रकार आघाडी कार्यकारणी खालील प्रमाणे प्रसिद्ध करण्यात आली. अध्यक्ष पत्रकार शिवाजी आप्पा पवार,उपाध्यक्ष बापू बोराटे , संजय शिंदे कार्याध्यक्ष जावेद मुलाणी,सचिव सत्यजीत रणवरे,सहसचिव संतोष आटोळे, सरचिटणीस योगेश कणसे,खजिनदार गणेश कांबळे,सहखजिनदार दत्ता पारेकर तर प्रसिद्धी प्रमुख पदी अतुल सोनकांबळे यांची निवड करण्यात आली असून संघटनेच्या सदस्य पदी अमोल भोग,बापु राहिगुडे,दत्तात्रय गवळी,लक्ष्मण भिसे,महेश गडदे,मुख्तार काझी,राहूल बोबडे,रामदास पवार,सलीम शेख,समीर सय्यद,संतोष जामदार,संतोष कदम,विशाल भोंग, शिवकुमार गुणवरे, भिमसेन उबाळे,अमोल कांबळे आदि पत्रकारांची निवड करण्यात आली. यावेळी पुणे जिल्हा बँकेचे संचालक अप्पासाहेब जगदाळे जिल्हा परिषदेचे माजी सभापती प्रवीण माने,माजी उपनगराध्यक्ष भरत शेठ शहा,राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे कार्याध्यक्ष महारुद्र पाटील शिवसेनेचे (ठाकरे)इंदापूर तालुका प्रमुख नितीन शिंदे, तालुका संघटक सुदर्शन रणवरे ,महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष संजय सोनवणे, तेज पृथ्वी ग्रुपच्या अध्यक्षा अनिता खरात, शिवसेनेच्या महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख सीमा कल्याणकर इंदापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सचिन खुडे अमर जगदाळे, कांतीलाल झगडे, दीपक अण्णा काटे, अशोक देवकर लहुजी शक्ती सेना पुणे जिल्हा अध्यक्ष दत्ताभाऊ जगताप कर्मवीर सहकारी साखर कारखान्याचे संचालक हिरालाल पारेकर इंदापूर अर्बन बँकेचे संचालक मनोज मोरे एडवोकेट आनंद केकान उद्योजक आबासाहेब कर्मवीर कारखान्याची संचालक हिरालाल पारेकर इंदापूर अर्बन बँकेचे संचालक मनोज मोरे अँड आनंद




केकान उद्योजक आबासाहेब राखुंडे वंचित बहुजन आघाडीचे संतोष मिसाळ व भटक्या विमुक्त जाती जमाती नेते तानाजी धोत्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

इंदापूर पंचायत समिती मधील सभागृहात झालेल्या पदनियुक्ती कार्यक्रमात बोलताना महाराष्ट्र राज्य जनसेवा संघटनेचे अध्यक्ष धवलसिंह मोहिते पाटील यांनी पत्रकारांना नियुक्तीपत्र देऊन सन्मानित केले या वेळी बोलताना मोहिते पाटील यांनी पत्रकारांच्या पाठीशी आपण खंबीरपणे उभे असल्याचे सांगत पत्रकार हा समाजातील एक महत्त्वाचा घटक असून पत्रकार हा वर्षाप्रमाणे असतो तो आपल्याला आपला खरा चेहरा दाखवत असतो सध्या समाजात पत्रकारांवरती होणारे हल्ले हे चिंताजनक असून महाराष्ट्र राज्य जनसेवा संघटना नाही पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी लढणारी असून आदरणीय प्रतापसिंह मोहिते पाटील यांच्या विचाराचा वारसा पुढे चालवत आहे पुढील काळात देखील संघटना पत्रकारांच्या व समाजातील दुर्बल घटकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिल असा विश्वास मोहिते पाटील यांनी दिला. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बापू बोराटे यांनी तर प्रस्ताविक शिवाजी पवार यांनी केले तसेच पत्रकारांच्या वतीने मनोगत सत्यजित रणवरे व भीमसेन उबाळे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन संजय शिंदे यांनी केले.

# भाजप युवा मोर्चा प्रदेश सचिव नितीन काळे यांच्या प्रयत्नांना मोठे यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : भाजप प्रदेश सचिव नितीन काळे त्यांच्या प्रयत्नांना मोठे यश पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर घरकुल योजना १७८६ लाभार्थी यांचा जीआर समाजसेवक भारतीय जनता पक्षाचे प्रदेश सचिव हे काही महिन्यापूर्वी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना प्रत्यक्ष भेटून निवेदन दिले होते.

महाराष्ट्र शासनाचे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना राबवण्यासाठी आली होती या योजनेच्या मध्ये सोलापूर जिल्ह्यातील १७८६ लाभार्थी परंतु यादी मंजूर करून मंत्रालय मुंबई येथे इतर मागास बहुजन मुंबई येथे मंजुरीसाठी पाठवण्यात आली होती परंतु त्या ठिकाणी पाठपुरावा कोणी करत नसल्यामुळे मंत्रालयात पडून राहिली होती नितीन काळे यांच्या लक्षात येता त्यांनी राज्याचे व इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांच्याकडे सतत पाठपुरावा करून तसेच मुख्यमंत्री यांनी कल्याण सचिव तात्काळीक कारवाई करण्याचे आदेश आदेश दिले व त्यानंतर अनेक महिने कालावधी झाल्यानंतर ही मंजुरी देण्यात आली नव्हती परंतु




नितीन काळे यांनी सातत्याने मंत्रालयात पाठपुरावा केल्याने केल्याने त्यांच्या या मोठे यश आले असे म्हणावे लागेल त्यांचे धनगर समाज बांधवाकडून अभिनंदन केले जात आहे.

नितीन काळे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी यश माझे आहेच परंतु अधिकाऱ्यांनी असेही त्यांनी म्हटले आहे समाजाच्या न्याय हक्कासाठी कायमच लढत राहणार यासाठी त्यांनी इतर महाराज बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे श्री रामरावजी वडकुते यांचे आभार मानले

# उमरगा शहरातील वृक्षप्रेमींच्या माध्यमातून १२०० झाडे लागवडीचा प्रकल्प यशस्वी

**दैनिक यशसिद्धी न्यूज नेटवर्क**

उमरगा/प्रतिनिधी : येथील उद्योग व्यवसायिक, प्राध्यापक, डॉक्टर, वकील असे क्षेत्रात कार्यरत झालेले, सामाजिक बांधिलकी म्हणून गेली चार महिन्यापासून कार्यरत आहेत. किमान दीडशे वृक्षप्रेमी यांच्या माध्यमातून गेली चार महिन्यापासून वृक्ष लागवड संगोपन जाळ्या घालणे,निगा राखणे,पाणी, संगोपन आणि देखरेख करणे अशा पद्धतीचे काम स्वयंसेवक म्हणून करत आहेत.



शेकडो हात या प्रक्रियेला जोडले गेले आहेत. कुणी जाण्यासाठी मदत करतात कुणी पैसे देतात,कोणी पाण्यासाठी मदत करतात. कोणी खड्डे खोदतात प्रत्येकाला जे वाटतं ते करत राहतात. हा विचाराचा महोत्सव, हा कार्याचा महोत्सव, हा श्रमदानाचा महोत्सव उमरगा येथे घडतो आहे. असेच कार्य पूर्ण भारतभर झाल्यास कोविड सारख्या महामारीला सुद्धा समर्थपणे तोंड देण्याची ताकद निसर्गात आहे. आणि ती पूर्ण केली जाईल.प्रत्येक माणसाने किमान एक झाड लावावं. एक झाड दान करावं.जागा नसेल तर स्मशानभूमीत लावावं.असा विचार घेऊन सर्व वकील, डॉक्टर, स्वयंसेवक, प्राध्यापक, छोटे व्यवसायिक, मित्रपरिवार या ठिकाणी राबतो आहे.

बाराशे झाडे लावून झालेली आहेत. आणि बाराशे झाड जिवंत आहेत. हा रिझल्ट महाराष्ट्रात कौतुक करणारा तयार झालेला आहे.हा विचाराचा प्रवाह लाखो हात जोडला जावा अशी वृक्षप्रेमींची इच्छा आहे.

# नळदुर्ग महाविद्यालयात वन्यजीव सप्ताह साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी (एस.के.गायकवाड) : नळदुर्ग येथील कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयामधे वनस्पतीशास्त्र विभाग, प्राणिशास्त्र विभाग आणि ग्रीन क्लबच्या संयुक्त विद्यमाने ' वन्यजीव सप्ताह-२०२४' . साजरा करण्यात आला. वन्यजीव आणि त्यांचा अधिवास आणि अस्तित्व सुरक्षित रहावे याकरिता जनजागृती करण्याच्या उदेशाने सर्वत्र दिनांक २ ऑक्टो ते ८ ऑक्टो दरम्यान दरवर्षी वन्यजीव संवर्धन सप्ताह साजरा करण्यात येतो. 'सहजीवनाद्वारे वन्यजीव संरक्षण ' ही यावर्षीची देशभरातील वन्यजीव सप्ताहाची संकल्पना आहे. त्यानिमित्ताने महाविद्यालयात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुभाष राठोड हे होते तर प्रमुख पाहुणे वनस्पतिशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डॉ.विजय सावंत हे होते.




कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि मार्गदर्शन ग्रीन क्लब समन्वयक प्रा.डॉ. उध्दव भाले यानी केले. त्यामध्ये त्यांनी वन्यप्राण्यांच्या आणि वनस्पतींच्या अधिवासात होणाऱ्या मानवी घुसखोरीमुळे आणि वेगवेगळया प्रकल्पामुळे वन्य सजीव अधिवासातून नामशेष आणि त्याचे अस्तित्व धोक्यात येत आहे त्यामुळे वन्यजीवा विषयी आजच्या युवा पिढीमध्ये जनजागृती करण्याचा उद्देश त्यांनी आपल्या प्रास्ताविक पर मनोगतात मांडला. त्यानंतर प्राणिशास्त्र विभाग प्रमूख आणि ग्रीन क्लब सहसमन्वयक प्रा डॉ हंसराज जाधव यानीही वन्यजीव संवर्धन विशेषतः नानज येथील नामशेष होत असलेला माळढोक पक्षी व अत्य प्राण्यांचा आणि वनस्पतीचा अभ्यास करने ही काळाची गरज आहे असे विषद केले. त्यानंतर अध्यक्षीय समारोपत प्राचार्य डॉ. सुभाष राठोड यानी युवकांनी नामशेष होत असलेल्या वनस्पती आणि प्राण्यांचा अभ्यास एखादया भरपूर जैवविधतेच्या असलेल्या ठिकाणी सहलीच्या माध्यमातून प्रत्यक्ष भेट देऊन करावा असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा डॉ निलेश शेरे यानी केले. यावेळी प्रा लता ढोणे , संशोधक विद्यार्थी किरण वंताळकर आणि निकीता कांबळे आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# दुधनी व मैंदर्गी महाराष्ट्र बँकेच्या हलगर्जीमुळे लाडकी बहीण अडचणीत : सैदप्पा झळकी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील दुधनी व मैंदर्गी येथील महाराष्ट्र बँकेतील अधिकार्यांच्या हलगर्जीपणा मुळे लाडकी बहीण योजनेपासून महिला योजने पासून वंचित राहिल्याचेल रिपाइं (आठवले)चे सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी यांनी व्यक्त केली आहे.



दुधनी व मैंदर्गी येथील बँक आफ महाराष्ट्र शाखेतील कर्मचारी वेळेवर खातेदारांच्या केवायसी केली नसल्याने ही महिला महाराष्ट्र सरकारच्या लाडकी बहीण योजने पासून वंचित राहिले असून या महिलेने दोन ते अडीच महिन्या पूर्वी केवायसी करण्यासाठी अर्ज बँकेत देऊनही संबंधीत अधिकार्यांने काम केली नाही.हा रिपब्लिकन पार्टी आँफ इंडिया (आठवले) च्या जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी यांच्या निदर्शनास आल्यामुळे त्यांनी शासनाचे अशा अनेक योजनेपासून या भागातील नागरीक व लाभार्थी लाभ घेतले नाही अशा काम चुकार अधिकार्यांना ताकीत देऊन केवायसी करुन घेण्याचे मागणी केली आहे.व वंचित लाभार्थ्यांना योजनेचे लाभ मिळावे.अन्यथा बँके समोर आंदोलन छेडण्याचा इशारा श्री सैदप्पा झळकी यांनी आमच्या प्रतिनिधीसी बोलतांना दिली आहे.

# अक्कलकोट शहरातील मौलाली गल्ली व परिसरातील वारंवार वीज खंडित समस्या बाबत निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी

मुख्य अभियंता एम एस ई बी मा. आडम व शहर विभागातील अधिकारी आलम शेख यांना लहुजी शक्ती सेनेच्या व अक्कलकोट परिवर्तन संघर्ष समिती यांच्यावतीने लेखी निवेदनाद्वारे कळवण्यात आले, मौलाली गल्ली, डबरे गल्ली, माळे गल्ली ,आझाद गल्ली, वट वृक्ष मंदिर परिसर,नाईकवाड गल्ली,भीम नगर, जनता चाळ, आदी भागामध्ये दररोज दिवसातून चार वेळा,रात्री दोन वेळा विजेचा लपंडाव चालू असतो.



वेळेवर वीज बिल भरून देखील दररोज लाईट गेल्याने येथील या भागातील नागरीक वारंवार होणाऱ्या वीज पुरवठा खंडित समस्येने त्रस्त झाले आहेत.

येणाऱ्या एक महिन्यामध्ये सुरळीत वीजपुरवठा न केल्यास असंख्य महिलांच्या वतीने एम एस सी बी कार्यालयावर बांगडी मोर्चा काढण्याचे आयोजन करण्यात येईल असे माध्यमांशी बोलताना लहुजी शक्ती सेनेचे जिल्हाध्यक्ष वसंत देडे यांनी एम एस ई बी मुख्य अभियंता आडम व आलम शेख यांना निवेदनाद्वारे कळवण्यात आले आहे.

मौलाली गल्ली मध्ये मोठ्या प्रमाणात मोटारसायकली बाहेरच लावलेले असतात पेट्रोल चोरणे मोटरसायकल चोरणे भविष्यात मोठा दरोडा पडणे या गोष्टी नाकारता येत नाहीत म्हणून खंडित झालेला वीज पुरवठा सुरळीत करण्याबाबत मुबारक कोरबु, सोहेल फरास माध्यमांशी बोलत होते.

या वेळी मुबीन अन्सारी, सोहेल फरास,सद्दाम शेख,मुबारक कोरबु, नवाज शेख,मौलाली लुकडे सर्फराज कमानघर,आशिफ ताची,विक्की कोरे आदि उपस्थित होते.

## तुळजापूर तहसिल कार्यालयाच्या वतीने बाल भिक्षेकरी पकड मोहिम यशस्वी

## यूवा ग्राम विकास मंडळ व शासकीय कर्मचाऱ्यांचा सहभाग

# नवरात्र महोत्सवात तुळजापूर मंदिर परिसरात बाल भिक्षेकरी मंडळाच्या ताब्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग /दादासाहेब बनसोडे : धाराशिव जिल्हा हा मागास जिल्हा म्हणून ओळखला जातो. हा जिल्हा बालाघाट डोंगराच्या कुशीत वसलेला आहे आणि याच जिल्ह्यातील तुळजापूरची आई तुळजाभवानी संपूर्ण महाराष्ट्राची नव्हे तर भारताची अराध्य दैवत मानली जाते याच तुळजापूरात बाहेर राज्यातुन व महाराष्ट्र राज्यातील आलेले अनओळखी बाल भिक्षेकरी या शारदीय नवरात्र महोत्सवात दिसुन येत आसल्यामुळे या बालकांना शिक्षण समूहाच्या प्रवाहात आणण्यासाठी शासकीय कर्मचारी व सामाजिक संस्थेचे कार्यकर्ते प्रभावी काम करत आहेत.

तुळजापूर शारदीय नवरात्र उत्सवात



सहभागी झालेले बालक व बालीका यांना रेस्कु मोहिम चालु करण्यात आली असून या मध्ये २ बालिका व १० बालके पकडण्यात करण्यात आली आहेत यामध्ये १० बालके धाराशिव येथे बालसुधार गृहात दाखल केले आसुन २ बालिका नळदुर्ग येथे अनाथ आश्रम आपलं घर प्रकल्पात दाखल करण्यात आली असून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. यामध्ये तहसील कार्यालय तुळजापूर यांच्या मार्गदर्शनाखाली आई तुळजाभवानी मंदिर परिसरामध्ये रेस्क्यू ऑपरेशन राबविण्यात आले यावेळी २ बालिका व १० बालके रेस्कु करुन त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी धाराशिव येथे बालकल्याण समिती समोर सादर करण्यात आली आहेत.

हे रेस्क्यू ऑपरेशन राबवण्यासाठी गटविकास अधिकारी तुळजापुर, मुख्याधिकारी नगर परिषद तुळजापुर, पोलीस स्टेशन तुळजापूर, तालुका आरोग्य अधिकारी तुळजापुर व युवा ग्राम विकास मंडळ अंतर्गत चालत असलेल्या ccess to Justice प्रकल्पाची सर्व टीम उपस्थित राहुन ऑपरेशन सर्च करित आहे .